# माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन कृती स्पर्धा व जनजागृती स्पर्धा

राज्य शासनाद्वारे आयोजित माझी वसुंधरा अभियान १.० मध्ये ठाणे महानगरपालिकेस अमृत शहराच्या गटात प्रथम पारितोषीक प्राप्त झालेले आहे. तसेच, सदर पारितोषीक रकमेच्या विनियोगाची कार्यपद्धती शासनाद्वारे निश्चित करण्यात आलेली असून त्यापैकी काही रक्कम महापालिका क्षेत्रातील नागरिकांचा अभियानामध्ये सहभाग वाढविणे व सदर रक्कम बक्षिस स्वरुपात वितरीत करण्यास निर्देशित आहे. त्यानुसार सदर स्पर्धेचे आयोजन ठाणे महानगरपालिकेद्वारे महापालिका क्षेत्रात करण्यात येत आहे.

माझी वसुंधरा अभियानाचा मूळ पाया हा निसर्गातील पृथ्वी, वायु, जल, अग्नी व आकाश या पंचतत्वावर आधारीत आहे. त्याच धर्तीवर ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध घटकांमध्ये उदा. गृहसंकुले, शैक्षणिक संस्था, वाणिज्य आस्थापना, औद्योगिक संस्था, इतर शासकीय कार्यालये/महाविद्यालये, इ. घटकांमध्ये निसर्गातील पंचतत्वावर आधारीत बाबींचा विचार करुन स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

सदर स्पर्धेच्या आयोजनामुळे गृहसंकुले, शालेय संस्था, वाणिज्य आस्थापना, औद्योगिक संस्था, इतर शासकीय कार्यालये/ महाविद्यालये, इ. पातळ्यांवर राबविण्यात येणा-या पर्यावरण संवर्धनीय उपक्रमांना प्रोत्साहन देऊन सदर संस्था/नागरिकांना ठाणे शहराच्या पर्यावरण संवर्धनात सहभागी करुन घेता येईल.

या स्पर्धेमुळे ठाणे महापालिका क्षेत्रातील उत्कृष्ट प्रकल्प ठाणे महानगरपालिकेस शासनाच्या मूळ माझी वसुंधरा अभियानामध्ये सहभागी करुन घेता येतील.

## सहभागी गट :

माझी वसुंधरा अभियानाकरिता राज्य शासनाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या निकषांवर आधारीतच घटकांवर सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले खालीलप्रमाणे नमूद गटांमध्ये स्पर्धा आयोजन होणार आहे.

| गट क्र. | गटाचे नांव |
|---|---|
| गट क्र. १. | **गृहसंकुले** |
| गट क्र. २. | **शैक्षणिक संस्था (ठामपा शाळा)** |
| गट क्र. ३. | **शैक्षणिक संस्था** (खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालये) |
| गट क्र. ४. | **सरकारी आणि व्यापारी संस्था** (हॉस्पिटल, हॉटेल्स, वरिष्ठ महाविद्यालये, सरकारी कार्यालये, खाजगी कार्यालये, इ.) |

सदर स्पर्धेमध्ये फक्त ठाणे महानगरपालिका हद्दीतीलच गृहसंकुले, शैक्षणिक संस्था, वाणिज्य आस्थापना, सरकारी आणि व्यापारी संस्था, हॉस्पिटल, हॉटेल्स, वरिष्ठ महाविद्यालये, सरकारी कार्यालये, खाजगी कार्यालये सहभागी होऊ शकतील. सदर स्पर्धा राबविताना संपूर्ण ठामपा क्षेत्रातील अधिकतम संस्था/आस्थापनांना सहभागी होता यावे व भौतिक परिस्थितीनुसार सर्व प्रभाग समिती क्षेत्रांतून स्पर्धक सहभागी व्हावे याकरिता यशस्वी स्पर्धक निवड ही ठामपा प्रभाग समिती स्तरावर करण्यात येईल.

## गुण वितरणाची पद्धत : (Self-Assessment Method)

सदर स्पर्धेत सहभागी होणा-या संस्था/आस्थापनांना दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीतील केलेल्या कामास अनुसरुन गुणांकन करावयाचे आहे. गुणांकन हे स्वयंमुल्य निर्धारण पद्धतीने (Self Assessment Method) करावयाचे असून संस्थेने स्पर्धा कालावधीत केलेल्या कामास अनुसरुन स्वतःलाच गुण वितरीत करायचे आहेत. वितरीत गुणांनुसार अधिकतम गुण प्राप्त संस्था/आस्थापनेची स्थळ-पाहणी महापालिकेच्या मुल्यमापन समितीद्वारे करुन गुणांची पडताळणी करण्यात येईल व त्यानुसार एकूण गुण निश्चित करण्यात येतील.

अंतिम गुण निश्चित करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. आयुक्त सो. यांचेद्वारे नियुक्त मुल्यमापन समितीचा असेल व त्या गुणांकनास आव्हान करता येणार नाही.

# पर्यावरण संवर्धन कृती स्पर्धा

| **पर्यावरण संवर्धन कृती स्पर्धा**<br>(Self Assessment Competition) | **जनजागृती स्पर्धा** |
|---|---|
| **स्पर्धेत सहभाग घेणारे स्पर्धक**<br>- गृहसंकुले<br>- शैक्षणिक संस्था (ठामपा शाळा)<br>- शैक्षणिक संस्था (खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालये)<br>- व्यापारी / सरकारी संस्था (हॉस्पिटल, हॉटेल्स, वरिष्ठ महाविद्यालये, सरकारी कार्यालये, खाजगी कार्यालये) | **स्पर्धेत सहभाग घेणारे स्पर्धक**<br>- हा स्पर्धा प्रकार सर्वांकरिता खुला आहे. |
| **स्पर्धा क्षेत्र**<br>- घनकचरा व्यवस्थापन व वृक्ष लागवड - ३० गुण<br>- ऊर्जा संवर्धन / जल संवर्धन - ३० गुण<br>- जनजागृती - ४० गुण<br>**एकूण - १०० गुण**<br>(**सर्व घटकांमध्ये सहभागी होणे बंधनकारक आहे.**) | **स्पर्धा क्षेत्र**<br>- माहिती पट (documentary) -१०० गुण<br>- पथनाट्य (Street Play) -१०० गुण<br>- माझी वसुंधरा अभियानाचा प्रसार (promulgation of Majhi Vasundhara) -१०० गुण<br>(**वरीलपैकी कोणत्याही एका गटात किंवा सर्व गटांमध्ये सहभागी होता येईल.**) |
| **स्पर्धा कालावधी**<br>दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ | **स्पर्धा कालावधी**<br>सदर स्पर्धा प्रकारांचे वेळापत्रक महापालिकेद्वारे घोषित करण्यात येईल. |

पर्यावरण संवर्धन कृती स्पर्धा – बक्षिसांचे स्वरूप (एकूण रू.४२,७५,०००/- रक्कमेची बक्षिसे)

| | **प्रथम पारितोषिक** | **द्वितीय पारितोषीक** | **तृतीय पारितोषीक** |
|---|---|---|---|
| **गृहसंकुले** | ५१००० | २१००० | ११००० |
| **शैक्षणिक संस्था (ठामपा शाळा)** | ५१००० | २१००० | ११००० |
| **शैक्षणिक संस्था (खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालये)** | ५१००० | २१००० | ११००० |
| **सरकारी आणि व्यापारी संस्था** (हॉस्पिटल, हॉटेल्स, वरिष्ठ महाविद्यालये, सरकारी कार्यालये, खाजगी कार्यालये) | ५१००० | २१००० | ११००० |

- प्रभागसमितीनिहाय वरील तक्त्यानुसार बक्षिसांचे वितरण करण्यात येईल.
- प्रभाग समिती स्तरावर अत्युत्कृष्ठ कामगिरीकरीता विशेष पारितोषीके वितरित करण्यात येतील.
- महापालिका स्तरावर अत्युत्कृष्ठ कामगिरीकरीता विशेष पारितोषीके वितरित करण्यात येतील.
- पर्यावरण संवर्धन कृती स्पर्धेअंतर्गत एकूण १३९ रोख पारितोषीके वितरित करण्यात येतील.

जनजागृती स्पर्धा – बक्षिसांचे स्वरूप (एकूण रू.५,१६,०००/- रक्कमेची बक्षिसे)

| | **प्रथम पारितोषिक** | **द्वितीय पारितोषीक** | **तृतीय पारितोषीक** |
|---|---|---|---|
| **माहिती पट** (documentary) | १००००० | ५१००० | २१००० |
| **पथनाट्य** (Street Play) | १००००० | ५१००० | २१००० |
| **माझी वसुंधरा अभियानाचा प्रसार** (promulgation of Majhi Vasundhara) | १००००० | ५१००० | २१००० |

- ही स्पर्धा महापालिका स्तरावर असेल.
- जनजागृती स्पर्धेअंतर्गत एकूण ९ रोख पारितोषीके वितरित करण्यात येतील.

# पर्यावरण संवर्धन कृती स्पर्धा

गुण वितरणाची पद्धत (एकूण अधिकतम गुण १००)

| घटक | अधिकतम गुण | गुणांकनाची पद्धत | गुणांकनाकरिता मार्गदर्शक तत्वे |
|---|---|---|---|
| • ओला-सुका कचरा वर्गीकरण<br>**किंवा**<br>• ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती<br>**किंवा**<br>• हरित कचरा व्यवस्थापन | १० | **Table 1**<br>>71 to 100% — 10<br>>41 to 70% — 05<br><40% — 00 | दैनंदिन कचरा व्यवस्थापनाकरिता नोंदवही असल्यास नोंदवहीच्या आधारे **किंवा** ढोबळ वजन पद्धतीनुसार गुणांकन करण्यात यावे. |
| • प्लास्टिक कचरा वर्गीकरण संकलन व पुर्नचक्रिकरण (TMC authorized originations)<br>**किंवा**<br>• E-waste वर्गीकरण संकलन व पुर्नचक्रिकरण<br>**किंवा**<br>• जैववैद्यकीय कचऱ्याचे नियमानुसार व्यवस्थापन | १० | **Table 2**<br>>71 to 100% — 10<br>>41 to 70% — 05<br><40% — 00 | पुनर्चक्रीकरण चलन /पावती किंवा प्रमाणपत्र आवश्यक |
| • स्पर्धा कालावधी ५ वृक्ष लागवड (६ फुट उंची) केली व नियमित निगा व देखभाल राखली<br>**किंवा**<br>• ५ ईको टूर आयोजित केल्या. | १० | **Table 3**<br>05 or more trees **OR** 05 Eco Tours — 10<br>03 or more trees **OR** 03 Eco Tours — 05<br><03 Tree **OR** <03 Eco Tours — 00 | ▪ स्पर्धा कालावधीत लागवड करण्यात आलेल्या वृक्षांच्या संख्येच्या आधारे गुणांकन करता येईल. **किंवा**<br>▪ Eco-Tours द्वारे लहान मुले, सदस्यांना झाडांबाबत व पर्यावरणाबाबत माहिती देता येते. अश्या स्वरुपाच्या टुर्स सोसायटीच्या आवारातदेखिल आयोजित करता येतात. |
| • LED दिवे लावणे<br>**किंवा**<br>• Solar Roof करणे<br>**किंवा**<br>• E-Charging | १० | **Table 4**<br>>30 LED/Solar lights **OR** Net Metering System / Solar Roof **OR** Level-1 or 2 type 02 No.s E-Charging stations. — 10<br>11 - 30 LED/Solar lights **OR** Level-1 or 2 type 01 No.s E-Charging stations. — 05<br><10 LED/Solar lights **OR** No E-Charging station. — 00 | गृहसंकुलामध्ये बसविण्यात आलेल्या LED / Solar दिव्यांच्या संख्येनुसार गुण देता येतील.<br>**किंवा**<br>गृहसंकुलामध्ये नेट मिटरींग पद्धतीने Solar Energy चा वापर होत असल्यास पूर्ण गुण देता येतील. अन्यथा गुण वितरण होणार नाही |
| • RWH (Rain Water Harvesting)<br>**किंवा**<br>• Rain Water Percolation pit<br>**किंवा**<br>• Borewell Recharging<br>**किंवा**<br>• STP सुस्थितीत राखणे | १० | **Table 5**<br>Proper & maintained RWH System alongwith efficient use of water **OR** Proper & maintained STP system alongwith efficient use of water — 10<br>Rain Water Percolation pit **OR** Borewell Recharging **OR** RWH, STP without reuse of water — 05<br>No RWH **OR** No Rain Water Percolation pit **OR** No Borewell Recharging **OR** No STP system — 00 | RWH (Rain Water Harvesting) **किंवा** STP सुस्थितीत असल्यास व सदर पाण्याचा पुनर्वापर योग्य पद्धतीने व प्रभावीपणे होत असल्यास पूर्ण गुण देता येतील.<br><br>Rain Water Percolation pit किंवा Borewell Recharging यंत्रणा कार्यान्वित असल्यास तसेच RWH, STP कार्यान्वित असल्यास परंतु पाण्याचा पुनर्वापर होत नसल्यास ५० टक्के गुण देता येतील. |

| घटक | अधिकतम गुण | गुणांकनाची पद्धत | गुणांकनाकरिता मार्गदर्शक तत्वे |
|---|---|---|---|
| • Water Audit<br>OR<br>• Energy audit<br>OR<br>• Fresh water Consumption reduce (Tap change, lekage prevention, use of solar pumps, automatic timer, etc.) | १० | **Table 6**<br>If Water Audit **OR** Energy audit completed & measures are implemented — 10<br>If Water Audit **OR** Energy audit completed but measures are not implemented — 05<br>No Water Audit **OR** Energy audit — 00 | Water Audit **OR**<br>Energy audit पूर्ण करून अंमलबजावणी केली असल्यास पूर्ण गुण देता येतील. |
| • जनजागृती उपक्रम - किमान १२ | १० | **Table 7**<br>12 or more awareness events — 10<br>6 to 11 awareness events — 05<br><6 awareness events — 00 | गृहसंकुलात आयोजित कार्यक्रमा दरम्यान पर्यावरणपुरक उपक्रमाचे आयोजन केल्यास (व्याख्यान, खेळातून प्रबोधन, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, इत्यादी) गुण देता येतील. |
| • पर्यावरण दूत<br>**किंवा**<br>• पर्यावरण सेवा (शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकरिता मर्यादित) | १० | **Table 8**<br>1 Mark for identification of each parayavaran doot — Max. 10 marks<br><br>**OR (For Schools)**<br>03 Paryavaran Seva Events — 10<br>02 Paryavaran Seva Events — 05 | ठाणे महापालिकेद्वारे आयोजित स्पर्धेतील विजेत्यांना पर्यावरण दूत म्हणून प्रमाणित करण्यात येईल.<br><br>**पर्यावरण सेवा हा घटक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकरिता मर्यादित असून या घटकात इयत्ता ७वी ते १२वीतील विद्यार्थी सामूहिकपणे सहभागी होऊन पर्यावरण कृती (प्रशिक्षण/उपक्रम/प्रबोधन) करतील.** |
| • E-Pledge | १० | **Table 9**<br>>100 E-Pledge — 10<br>51-100 E-Pledge — 05<br>21-50 E-Pledge — 03<br><20 E-Pldege — 00 | राज्य शासनाच्या माझी वसुंधरा पोर्टलवर E-Pledge नोंदणी करून प्रमाणपत्र प्राप्त करून घेता येईल. |
| • सोशल मिडियावरील व्याप्ती (TMC Page) | १० | **Table 10**<br>>500 likes on TMC's Social Media Page — 10<br>301-500 likes on TMC's Social Media Page — 05<br>101-300 likes on TMC's Social Media Page — 03<br><100 likes on TMC's Social Media Page — 00 | या घटकांतर्गत ठाणे महानगरपालिकेच्या सोशल मीडिया पानावर पर्यावरण संवर्धन सूचना देणाऱ्या किमान १० पोस्ट टॅग करून अधिकतम likes प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. |

# जनजागृती स्पर्धा

## गुण वितरणाची पद्धत

| घटक | अधिकतम गुण | गुणांकनाची पद्धत | |
|---|---|---|---|
| • माहिती पट (documentary) | १०० | **Table 1** | |
| | | Innovative Theme | 30 |
| | | Lenght, Shooting & video quality/frame | 30 |
| | | No of plays & likes on social media page of TMC | 40 |
| • पथनाट्य (Street Play) | १०० | **Table 2** | |
| | | Innovative Theme/Script and Presentation | 40 |
| | | Number of Actors, Length of Play | 20 |
| | | No of plays & likes for play tagged on social media page of TMC | 40 |
| • माझी वसुंधरा अभियानाचा प्रसार (promulgation of Majhi Vasundhara) | १०० | **Table 3** | |
| | | Innovative Theme | 30 |
| | | Size of sculpture/structure | 30 |
| | | Simplicity / sustainability / creativity / replicability | 40 |

**महत्वाच्या सूचना**

- या स्पर्धा प्रकारांमध्ये कोणत्याही घटकातील स्पर्धक सहभागी होऊ शकतात. उदा. गृहसंकुले, वाणिज्य आस्थापना, हॉस्पिटल, शाळा, महाविद्यालय, सामाजिक संस्था, औद्योगिक आस्थापना इत्यादी.
- जनजागृती स्पर्धेतील सर्व सादरीकरणे ही फक्त मराठी भाषेतील असणे बंधनकारक आहे.
- या स्पर्धा प्रकारांकरिता मुख्यत्वे पुढील विषय असतील.
    - हरित आच्छादन आणि जैवविविधता (Green Cover & Biodiversity)
    - एकल प्लास्टिक वापर बंदी आणि प्लास्टिकला पर्यायी वस्तुंचा वापर (Single Use Plastic Ban & Alternative to Single Use Plastic)
    - वातावरणीय बदल आणि उपलब्ध जलसाठ्याचे संवर्धन (Climate Change & Reduction in Fresh Water Consumption)
    - ध्वनी तीव्रतेच्या फटाक्यांवर बंदी, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर, अक्षय ऊर्जा (Banning of fire cracker, use of electric vehicles, renewable energy)
    - किमान कचरा निर्मिती (Solid waste reduction)
    - पर्यावरणपूरक उत्सवांचे साजरीकरण (Eco friendly festivals)
    - पाणथळ आणि कांदळवनांचे संवर्धन (Conservation of wetlands/mangroves)